डअउइक्आघढ्ख झठअघअड्क

ठ्शसव. छे. १०२३/५७

**बुक पोस्ट**

प्रति,

द्वारा

**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**

श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०.

**शब्दविकास** : विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९५) पौष ते फाल्गुन - शके १९४४ - जानेवारी ते मार्च २०२३ (संयुक्तांक ४ ते ६)

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ७ |
| ३) | कविता - शताब्दी वर्ष | १३ |
| ४) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १४ |
| ५) | मंगलाचरण | २० |
| ६) | अमृतकण | २२ |
| ७) | निवेदन | २४ |
| ८) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २६ |
| ९) | विशेष सूचना | २९ |
| १०) | शताब्दी वर्षातील काही निवडक कार्यक्रम | ३० |
| ११) | शोकवृत्त | ३२ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।



**- संपादकाचे बोल -**

**(वर्ष ९४) आश्विन ते मार्गशीर्ष (शके १९४३)**
**(संयुक्तांक १ ते ३)**
**(ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०२२)**
**मासांतील कार्यक्रमाचा गोषवारा**

९४ वर्षाचा प्रवास करीत हा अंक ९५व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. ही सर्व वाटचाल पाहिली नसली तरी ऐकणारी कितीतरी सद्भक्त असतील व हे खरोखरच स्पृहणीय आहे. आमच्या सद्‌गुरुंनीच हे सद्‌भक्त घडवले आहेत. पुढेही ते मार्ग दाखवतील ही आशा आहे. त्यांची आजन्म कृपादृष्टी असावी हीच गुरुमाऊलीच्या चरणी प्रार्थना व विनंती आहे.

सद्भक्ती मंदिराचे शताब्दी वर्ष सुरू आहे. त्यासाठी वर्षभर अधूनमधून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा सर्वांनी आस्वाद घ्यावा ही विनंती.

**(आश्विन मास)**

बुधवार दि. ५.१०.२००२ (आश्विन शुद्ध - शुद्ध दशमी - विजया दशमी) (दसरा) होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. याच दिवशी सद्भक्ति प्रसारक मंडळींचा वर्धापन दिन असतो. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) येई येई रामराया। डोई ठेविन तुझ्या पाया (४) मम हृदय गगन रवि उघड करील त्यां। गुरुला मी नमी।। (५) गुरुवरां आहे। अनाथ मी आहे (६) नवविधा भजन घडो। तुझिये स्वरूपी प्रीति जडो।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. सायंकाळी ५ वाजता प्रवचन वाचन व सोने वाटप झाले. सायंकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणूक निघाली. ही पालखी सारस्वत कॉलनी व हिंदू फ्रेंडस सोसायटीमधून प्रस्थान करते.

रविवार दि. ९.१०.२०२२ रोजी मंदिरात लघुरुद्राचा नेत्रदिपक सोहळा झाला व मंत्रघोषाने अवघ्या आसमंत दुमदुमून गेला. वातावरण खूपच पवित्र वाटत होते. त्यावेळी सुद्धा आपल्या सद्भक्तांनी भावपूर्ण पदे म्हटली. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ सर्वांना मिळाला. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता कोजागिरीनिमित्त थोडेसे भजन म्हटले व सनईवादक श्री. मधुकर धुमाळ ह्यांचे सुपुत्र श्री. ओंकार धुमाळ ह्यांचे सुश्राव्य सनईवादन झाले. त्यांच्या भगिनींनी भक्तिगीते सादर केली. ते सुद्धा श्रवणीय झाले. त्यापूर्वी सायंकाळी ५ वाजता गुरुवर्य भाईंच्या प्रथम पुण्यतिथी दिनी झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचन वाचनास प्रारंभ झाला.

## गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथ्योत्सव

बुधवार दि. १२.१०.२०२२ (आश्विन वद्यतृतीया) रोजी गुरुवर्य श्री भाईंची व श्री बाळेकुंद्री महाराजांची पुण्यतिथी होती. प्रातः स्मरणाचेवेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता गुरुपादुकास एकादशणी झाली.

त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) अबोला का रे धरिसी (४) तुजहुनि कोणी नसे मज थोर गुरुजी (५) मधुर मधुर बघु मुरली तुझी रे (६) मज आठवतो गुरुराजा (७) सद्‌गुरु मनमोहना, श्री सद्‌गुरु सनातना (८) लोटू नको मज दूर कन्हैय्या (९) जशी पक्षिणी पक्षहीन पिलाते। मुखी अन्न घालुनि रक्षी तयाते (१०) करी रे दया दयाळा। प्रसन्न होऊनि हरि ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले व सर्व सद्भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी ५ वाजता चरित्रवाचन झाले. त्यावेळी सुद्धा सुमधुर पदे म्हणण्यात आली. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव संपन्न झाला.

गुरुवार दि. १३.१०.२०२२ (आश्विन वद्य चतुर्थी) रोजी सायंकाळी ६ वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या पदांचे श्रवण झाले.

शुक्रवार दि. १०.१०.२०२२ (आश्विन वद्य पंचमी)ला सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले. त्यावेळी सर्वांनी सुमधुर पदे म्हटली.

शनिवार दि. १५.१०.२०२२ (आश्विन वद्य षष्ठी) रोजी समाप्ती दिन होता. गुरुवर्यांनी आमची सेवा मान्य करून घ्यावी अशी कळकळीची विनंती करण्यात आली.

शनिवार दि. २२.१०.२०२२ (आश्विन वद्य द्वादशी) गुरु द्वादशी रोजी प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) गुरुचे भजन, हेंचि माझे ध्यान। तेंचि पूर्णज्ञान जाण माझे (४) आठवू किती उपकार श्री गुरुचे। भक्त मनोरथ पूर्ण कराय रूप धरि साकार।। (५) सद्‌गुरुसारिखा सोयरा जिवलग। तोडिता मोह संसाराचा। (६) अहो! सद्‌गुरुची कृपा। तेणे दाखवी स्वरुपता।। (७) माऊलीसी पान्हा प्रेमाचा फुटला। घेऊनि जवळ मुखालागी।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता गुरुद्वादशीनिमित्त झालेल्या गुरुवर्य श्री भाईंच्या प्रवचनाचे वाचन झाले. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक निघाली. यावेळी शताब्दीनिमित्त खास भजनी मंडळ पाचारण केले होते. पालखी समोर त्यांनीही सुमधुर भजने म्हटले व फटाक्यांची आतिषबाजी पण करण्यात आली.

सोमवार दि. २४.१०.२०२२ (आश्विन वद्य चतुर्दशी)ला नरकचतुर्दशी

होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. १० वाजता श्री रामेश्वर मंदिरात उद्धव गोपी गीताचे सामुदायिक भजन झाले व इतर पदेही म्हणण्यात आली.

## (कार्तिक मास)

बुधवार दि. २६.१०.२०२२ (कार्तिक प्रतिपदा) होती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आळी. सकाळी १० वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या सुखासना निमित्त झालेले सद्‌गुरु दादाभाईंचं प्रवचन वाचन झाले. ११.३० वाजता एकदाशणी केली गेली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) बंधुभगिनी होय आज भगिदिनी। एक वदुनि व्हा एकरूप हरि (४) मागतां आश्रय तुझे दारी। देई मज हरि कृपादान।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

शुक्रवार दि. ४.११.२०२२ रोजी (कार्तिक शुद्ध एकादशी प्रबोधिनी एकादशी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता 'प्रसाद मेवा' या सद्‌गुरु दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन झाले व इतर पदे म्हणण्यात आली.

सोमवार ७.११.२०२२ला (कार्तिक शुद्ध चतुर्दशी होती. गुरुवर्य श्री भाईंचा अस्थि विसर्जन दिन होता. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना केली गेली. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) आण तुझी सद्‌गुरुनाथा। नावडे आता आणिकाची (४) आस इतुकी उरली की। मिठी मारीन सद्‌गुरुसि।। (५) गुरुचे भजन हेचिं माझे ध्यान। तेंचि पूर्ण ज्ञान जाण माझे (६) येई येई रामराया। डोई ठेविन तुझिये पाया।। आणि शेवटी (७) अर्पियला निज प्राण देवा।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. नंतर कमळे वाहाण्याचा कार्यक्रम झाला. सायंकाळी ५ वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या वैकुंठ रोहणा दिवशी झालेल्या सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन झाले.

मंगळवार दि. ८.११.२०२२ (कार्तिक पौर्णिमा) त्रिपुरारी पौर्णिमा होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली.

बुधवार दि. १६.११.२०२२ (कार्तिक वद्य अष्टमी) श्री काळभैरव जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

मंगळवार दि. २२.११.२०२२ (कार्तिक वद्य त्रयोदशी)ला श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना झाली.

आपल्या मंदिराचे शताब्दीवर्ष असल्यामुळे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अनावधानाने तीन कार्यक्रम लिहायचे राहून गेले आहेत. ते आता लिहित आहे. कृपया छापताना त्या तारखा व ते कार्यक्रम छापून घ्यावे.

रविवार दि. ३०.१०.२०२२ रोजी मंदिराच्या नित्योउपासने नंतर पंडित श्री नित्यानंद हळदीपूर यांचे सुश्राव्य बासुरी वादन झाले. कार्यक्रम फारच बहारदार झाला. श्रोते अगदी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते.

रविवार दि. ६.११.२०२२ला सांयकाळी ६ वाजता पंडित महेंद्र टोके ह्यांचे शास्त्रीय संगीत झाले व फारच श्रवणीय झाले.

रविवार दि. २७.११.२०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता सौ. रश्मी मंजुरे ह्यांचे सुमधूर शास्त्रीय संगीत झाले व सद्भक्तांना त्याचा लाभ मिळाला.

**(मार्गशीर्ष मास)**

शुक्रवार दि. २.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) ला श्री. निरंजन रघुनाथ स्वामी महाराजांचा पादुका स्थापना दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

शनिवार दि. ३.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी. मोक्षदा एकादशी) होती. श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभू पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. सकाळी १० वाजता श्री भगवद्गीतेचे सामुदायिक पठण झाले.

बुधवार दि. ७.१२.२०२२ (मार्गशीर्ष पौर्णिमा) श्री दत्तजयंती होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना झाली. ११.३० वाजता एकादशणी झाली. (१) त्यावेळी माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनी माझा (३)

श्री गुरुदत्ता दयासागरा प्रभो (४) दत्तासि गाईन, दत्तासि पाहीन। वाहीन हे मन दत्तापायी (५) दत्त माझी माता, दत्त माझा पिता (६) बोल, बोल, बोल दत्ता। बोल एक बोल रे।। (७) दत्त गुरुराज, दत्त महाराज। दत्त योगीराज स्मृतगामी।। (८) भवतारक ह्या तुझ्या पादुका वंदीन मी माथा। करावी कृपा गुरुनाथा।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ सर्व सद्भक्तांना मिळाला. सायंकाळी ६ वाजता दत्त जन्मोत्सव संपन्न झाला. त्यावेळी (१) दत्ताचिया गुरुगोविंदा। जय जय दत्त परमानंदा।। (२) हो परम सनातन विश्व भरूनि उरला। गुरु दत्तराज ऋषी कुळांत अवतरला।। त्यानंतर (१) बाळा जो जो रे कुलभूषणा। श्री अत्रिनंदना। (२) गुण धरूनि हालिवतो जो। मुनि मानस रंजन जो जो।। हा पाळणा म्हणण्यात आला. नंतर काही पदे व दत्त गुरुराज, दत्त महाराज, दत्त योगीराज स्मतृगामी ही प्रार्थना म्हणण्यात आली. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली.

गुरुवार दि. ८.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा) सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले.

गुरुवार दि. १४.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य षष्ठी) रोजी श्री मोरया गोसावी पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

रविवार दि. १८.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य दशमी)ला श्री रंगनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

रविवार दि. १८.१२.२०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता जोगेश्वरी येथील श्री. मनोज वाघ व भक्त परिवार ह्यांचे अभंग व भक्तीगीत गायन झाले. सर्व कलाकार उदयोन्मुख कलाकार आहेत.

रविवार दि. २५.१२.२०२२ (नाताळ - ख्रिसमस) श्री येशू ख्रिस्त जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली.

शनिवार दि. ३१.१२.२००२ रोजी आपल्या सद्भक्ति मंदिरात नवचंडी याग आहे. सर्व सद्भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घ्यावा.

**: इति :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

७.१२.१९३०

**श्री गणेशाची आरती**

**"जयदेव, जयदेव, ॐकारा, गणराया । जय सद्गुरु राया ।।**

**आरती ओवाळूं तुज विघ्नें हराया...।।धृ.।।"**

श्री गणपतीच्या आरतीच्या ध्रुव पदावर बरेच दिवस विवेचन चालले आहे. ह्या ध्रुवपदांत मुख्य तीन शब्द आहेत :- "ॐकार", "गणराय" व "सद्गुरुराय." पुन्हा ॐकारांत ही तीनच अक्षरें आहेत :- "अ", "उ" व "म" म्हणजे ब्रह्मा, विष्णु व महेश. ह्या संबंधाने "ॐकाररुपा गणेशा माधवा" ह्या शंकरसुधेंतील अभंगावर विवेचन झाले त्यावेळी विचार करण्यात आला होता व असे सांगण्यात आले होते. आता सद्गुरुमध्ये "अ", "उ" व "म" कोठे आहेत ह्याचा आपण विचार करू. ह्याचे उत्तर वामनपंडितांनी दिले आहे ते असे :- "ब्रह्म निर्गुण। ब्रह्मचि ईश्वर सगुण। ब्रह्मचि ईश्वर त्रिगुण। ऐसें कळेल तरच ब्रह्म कळले।।" ज्याला निर्गुण, सगुण व त्रिगुण ब्रह्माचा पूर्ण अनुभव आहे तोच सद्गुरु ह्या पदवीस योग्य आहे. ज्याच्या शब्दा मात्रें करून शिष्याला निर्गुण ब्रह्माचा पूर्ण अनुभव येतो. तोच सद्गुरु, कारण विहिरीत असल्याशिवाय पोहऱ्यांत येणार नाही या

न्यायाने सद्गुरुला निर्गुण ब्रह्माचे पूर्ण अनुभवजन्य ज्ञान असल्याशिवाय त्याला ते शिष्याला देता येणार नाही. तेव्हा निर्गुण ब्रह्म म्हणजे "अ"कार सद्गुरुमध्ये आहे हे सिद्ध झाले. आता ईश्वर सगुण म्हणजे विष्णू, अर्थात स्थिती काळ पालनकर्ता, तोच "उ"कार, आणि "विश्व त्रिगुण" म्हणजे ब्रह्मदेव अर्थात चराचर सृष्टि. सारांश "अ"कार, "उकार", व "मकर" अर्थात ब्रह्म निर्गुण, ब्रह्म सगुण व ब्रह्म त्रिगुण ह्या त्रिमूर्तीचें ज्ञान ज्याला झाले आहे तो सद्गुरु. यावरून असे सिद्ध झाले की "ॐकार", "गणराया" व "सद्गुरु" हे तीन्ही एकत्र आहेत.

सद्गुरु हा निर्गुण आहे. कारण त्याच्या शब्द मात्रे करून शिष्याला ब्रह्माचा अनुभव होतो :- "जो शब्द ज्ञानें पारगंत। ब्रह्मानंदी सदा डुलत। शिष्य प्रबोधिनीं समर्थ। तो मूर्तीमंत स्वरूप माझें।।" सद्गुरुच जगद्रूपें करून झाला आहे. ह्याविषयी वामनपंडित एका सवाईत म्हणतात :- "दुर्लभ मानव देह तयांत हि दुर्लभ तें कितीकाळ जिणें। त्यातही दुर्लभ संत समागम काय जिणें हरि भक्ति विणें।। ज्यांसि हरि प्रिय जे हरीचे प्रिय भेटती ते जगतात्मपणें। दुर्लभ दुर्लभ तें म्हणे वामन जें मन शोधिती विष्णु गुणें।।" पहिल्याने मानव देह प्राप्त होणे हेच मुळी कठीण. त्यातून तो जरी मिळाला तरी बालपणी कितीतरी मरण पावतात. कित्येक ऐन तारुण्याच्या भरात मरण पारतात. परंतु अगदी म्हातारे होऊन मरण पावणारांची संख्या फारच थोडी. जरी एखादा मनुष्य पुष्कळ वर्षे जगला. परंतु जर त्याला सत्संगति मिळाली नाही तर त्याचे जिणे "हरि भक्तिविणें" व्यर्थ होय. बरे त्याला संत संगति प्राप्त झाली तरी सत्संगतीत पाहून त्याला स्वरुपाचा बोध होत नाही. तरी देखील तो कृतकृत्य होत नाही. ज्ञान झाल्यावर भक्ति सुखाचे सोहळे भोगता आले तरच तो पुरुष धन्य होय. परंतु असा ज्ञानी अतिशय दुर्लभ होय. म्हणून वामन पंडितांनी "दुर्लभ, दुर्लभ" असे दोनदा म्हटले आहे. अशा ज्ञानी भक्ताचा देह जरी दोन हाताचा दिसला, तरी त्याचा अनुभव आपणच जगद्रूपें करून आहोत असा असतो :- "भेटति ते जगदात्मपणें।।" ह्या वरून आपली खात्री झाली असेल "सद्गुरु", "गणपती", व "ॐकार" हे तीन्ही एकच आहेत.

ह्या सद्गुरु गणपतीला "विघ्नें हराया" आरति ओवाळीली आहे. अर्थात कठीण प्रसंग व संकटें दूर होऊन परमार्थ सुरळीतपणे चालावा हा आरती ओवाळण्याचा हेतू आहे. गणपतीची उपासना करणाऱ्यांचे दोन वर्ग आहेत. एकांत

अज्ञानी भक्तांचा व दुसऱ्यात निष्काम भक्तांचा व साधकांचा समावेश होतो. संकष्टी चतुर्थी करणारे अज्ञानी भक्त, व विनायकी करणारे निष्काम मुमुक्ष व साधक. मागल्या खेपेस मुमुक्ष ज्ञान प्राप्त होण्यास गणपतीची कशी प्रार्थना करितो ह्या संबंधाने आपण विचार केला. आज आपण ज्ञान जतन होण्याच्या आड जी विघ्नें येतात, ती दूर व्हावी व ज्ञान बिंबावे म्हणून साधकाने भगवंताची कशी प्रार्थना करावी ह्या मुद्याचा विचार करू. "हे गणेशा! सद्गुरु भगवंता! माझ्या ज्ञानाच्या आड येणाऱ्या विघ्नांचे निवारण करून मला तुझ्या स्वरूपानंदाचा लाभ घडू दे." इतकेच तुझ्या पायाजवळ माझे मागणे आहे. :- "एकांतीचे सुख देई मज देवा। आघात या जीवा चुकवूनियां।।" आघात म्हणजे आकार. जगात जे नाना आकार दिसतात ते स्वरूपाच्या आड येतात व स्वरूपाच्या ठिकाणी चित्त दिसतात ते स्वरूपाच्या आड येतात व स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर राहू देत नाहीत आता "एकांत" ह्या शब्दाचे दोन अर्थ आहेत. "व्यतिरेक" व "अन्वय" ज्ञान. व्यतिरेक ज्ञान झाले असता अन्वय ज्ञानाची काय आवश्यकता आहे असे कोणाला वाटण्याचा संभव आहे. तर ह्याचे उत्तर असे आहे की, अज्ञान दोन तऱ्हेचे आहे. एक आवरण व दुसरा विक्षेप. दोन न जाणणे हे आवरण व त्याचे निरसन व्यतिरेक ज्ञानाच्या योगे होत असते. दोरावर सर्पाचा आरोप करणे हा विक्षेप, व त्याचे निरासन अन्वय ज्ञानाने होते. योगी समाधिस्थितीत असेपर्यंतच त्याला व्यतिरेक ज्ञानापासून सुख होईल. परंतु व्युत्थान काळी त्याला जड जग पूर्वीसारखेच दु:खरूप भासेल. अन्वय योग्याची स्थिती त्याच्याहून भिन्न आहे. त्याच्या सुखाच्या भंग प्रपंचात वर्तत असता ही होत नाही :- "एवं चाले बोले उठे बैसे। तरी अन्वय समाधि लागला असे। की जड चैतन्य ऐक्यांत समरसे। मानस त्या योग्याचें।।" (पु.दी. २२९)

तुकाराम महाराजांनी "एकांतीचे सुख" या अभंगांत "एकांत" या शब्दाचा अन्वय ज्ञानार्थी असा अर्थ घेतला आहे. वामन पंडितांनी ही "एकांत" शब्दाचा अर्थ अन्वय ज्ञान असाच केला आहे.

"कर्मे दासपणें करुनि निपुणें नारायणीं अर्पणें। पापातेंक्षपणें रमापति गुणें प्रेमामृता सेवणें।।" सत्संगी बसणे स्मृतीत असणे.

"एकांतीचें बैसणें। सर्वां हें करणे भवाब्धि तरणें दुर्वासना मारणें।।"

"स्मृतींत असणें" म्हणजे व्यतिरेक ज्ञान योगाचा अभ्यास करणे :-

"योगी युजींत सततमात्मानं रहसि स्थित:।

एकाकी यतचित्तात्मा निराशीर परिग्रह:।।" (भ.गी. ६/१०)

भवाब्धि तरुन जाण्याला अन्वय ज्ञानाची आवश्यकता आहे. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की :- "याच देहीं याच डोळा। भोगीन ब्रह्मानंदाचा सोहळा।।" या देहीं म्हणण्याचे कारण असे आहे की देह सुटल्यावर त्यांना सायुज्य मुक्ति मिळणारच होती. पण त्यांना ती नको होती, म्हणून "याच डोळां भोगीन ब्रह्मानंदाचा सोहळा।।" याचा अर्थ असा की चालत असता, बोलत असता, पहात असता, स्पर्श करीत असता, खात असता मी ब्रह्मसुख अनुभवीत. "डोळा" ह्या एका शब्दावरून सर्व इंद्रिय व्यापारांचा बोध होता. सारांश सर्व इंद्रिय द्वारा भगवद्रूप पहाता यावे म्हणून तुकाराम महाराज भगवंताची प्रार्थना करितात :- "एकांतीचे सुखे देई मज देवा। आघात याजीवा चुकवूनियां।।" मनुष्य पाहिला तरी त्याच्या आकारावर दृष्टि न ठेविता त्याच्या हृदयात असणाऱ्या आत्म्याकडेच लक्ष देईन :- "तुका डोंगा परि विठू नव्हे डोंगा। का रे भुललासी वरलीय सोंगा।।" वरचे सोंग म्हणजे आकार-आघात-विक्षेप, देवा! माझ्या दृष्टीस पडू देऊ नकोस. अर्थात हे भगवंता! जेथे जेथे माझे मन जाईल. तेथे तेथे तुझेच रूप माझ्या दृष्टीस पडावे अशी माझ्यावर कृपा कर :- "जेथे जेथे मन जाईल हे माझे। तेथे तेथे तुझे रूप असो।। ऐसी मज संवई लावी निरंतरीं। जन्मोजन्मांतरी केशीराजा।।" नामदेवांनी सुद्धा तुकाराम महाराजांप्रमाणेच देवाची प्रार्थना केली आहे की, "देवा! माझे लक्ष वरच्या सोंगाकडे जाऊ देऊ नकोस, त्यांच्या हृदयात असलेल्या तुझ्या रूपाकडे जाऊ दे" तुकाराम महाराजांनी वर सांगितल्याप्रमाणे प्रार्थना केल्यावर, देवाने त्याच्याकडे डोळे वटारून पाहिले. असे करण्याचे कारण असे की, एकच गोष्ट जर आपण पुन्हा पुन्हा एखाद्या मनुष्याला विचारली, तर त्याला राग येण्याचा संभव असतो. देव तुकाराम महाराजांना म्हणाले, "अरे, सनत्कुमारांना ही हंसरूपाने अवतीर्ण होऊन जो उपाय सांगितला, तोच उपाय मी कृष्णावतारी जेव्हा तू उद्धव होतास, तेव्हा तुला समजावून सांगितला होता. बरे त्यावेळी तुला समजले नसेल, पण जेव्हा तू नामदेव झाला होतास. तेव्हा तू मजपाशी हेच मागणे मागितले होतेस आणि आता तुकाराम ह्या नात्याने तू पुन्हा तेच मागतोस. तेव्हा तुला काय

म्हणावे? कदाचित तू म्हणशील की भागवत संस्कृत भाषेंत लिहिले आहे आणि संस्कृताचे मला ज्ञान नाही. पण मी तुला असे विचारतो की एकनाथ महाराजांनी भागवतावर शुद्ध मराठीत टीका केली, व त्या टीकेची तू हजार पारायणे केली आहेस. असे असून चराचर भगवद्रूप दिसण्याला जो सोपा उपाय त्यात सांगितला आहे. तो तू अंमलात का आणीत नाहीस? तेथे तुझ्या शंकेचे पूर्ण निरसन केले आहे ते असे."

"तात्काळ जावया देहाभिमान। अखंड माझे नामस्मरण।
गीत नृत्य हरिकीर्तन। सर्वांभूती समान मद्भावो।।
मद्भावें भूतें समस्त। सर्वदा पाहतां सतत।
मी तूरीय जो सर्व गत। तें ठायी चित्त प्रवेशे।।"

वृत्ती स्वरूपात जाण्याचा हा सुलभ उपाय तुला पुष्कळ वेळा सांगितलेला असून तू पुन्हा पुन्हा माझे डोके का उठवितोस, असे म्हणून विठोबाने तुकाराम महाराजांकडे डोळे मोठे करून पाहिले. परंतु तुकाराम महाराज फार धूर्त होते. त्यांनी विठोबाच्या ह्या उत्तराला दाद दिली नाही. त्यांची इच्छा होती की विठोबाने आपल्या करिता स्वत: मेहनत करून आपल्या पदरात त्याचे पूर्ण फळ घालावे. उदाहरणार्थ एक भटजी एका श्रीमंत गृहस्थाच्या आश्रयास होते ते यजमानाजवळ नेहमी म्हणत असत की, "काय करावे बुवा, मुलगा नाही. त्या गृहस्थाचे भटजीस असे उत्तर असे की, अहो लग्न करा म्हणजे तुम्हाला काही काळाने मुल होईल." त्यावर भटजी म्हणाले, "ते खरे आहे. पण मी लग्नाकरिता मुलगी शोधण्याला कोठे जाऊ? तुमच्या ओळखीची कितीतरी मंडळी आहे. त्यापैकी कोणाच्या तरी मुलीशी माझी सोयरीक जमवून माझे यथासांग लग्न करून द्या म्हणजे झाले." तद्वत विठोबा तुकाराम महाराजांना म्हणाले, "सर्व आकार भगवद्रूप दिसण्याला कृष्णावतारी मी जो उपाय तुला सांगितला होता, तोच तूं कर."

**"ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर। आपुला विसर पडों नेदीं।।"**

सर्व सृष्टी भगवद्रूप दिसण्याला "नाम आणि रूप" हा उपाय पुरे आहे. परंतु तुकाराम महाराजांनी ह्या दोन गोष्टीतर पदरात पाडून घेतल्याच, आणि तिसरी प्राप्ती होण्यासाठी त्यांनी पुन्हा देवाची पायधरणी चालविलीच. नुसत्या "नाम व

ध्यानी रूप" ह्या उपायाने चित्त चैतन्य होईल व जीवन्मुक्ति प्राप्त होईल, पण मुक्तीवरील भक्ती प्राप्त होणार नाही अर्जुनाला "अक्षरं ब्रह्म परमम्" म्हणून अन्वय व्यतिरेक ज्ञान दिले. पण वैकुंठवासाच्या प्राप्तिसाठी त्याला पराभक्ति निराळी मागावी लागली. तशीच मुक्तिवरची भक्ती उद्धवाला ही वेगळी मागावी लागली. त्याचप्रमाणे तुकाराम महाराजांनी "आपुला विसर पडो नेदी।।" ह्या चरणात भगवंताजवळ पराभक्तिच मागितली आहे, आणि ती केवळ वरकरणी मागितली नाही, तर निश्चयात्मक बुद्धिने मागितली आहे असे कशावरून म्हणाल तर "विसर पडो नेदी", ह्यात "विसर" म्हणजे स्मरण न होणे हा नकारार्थी शब्द आहे. आणि "पडो नेदी" हाही नकारार्थीच आहे. तेव्हा म्हणजे "दोन नकारार्थी शब्दांचा निर्याणक होकारार्थ" होतो. असा व्याकरणाचा नियम आहे. "आपुला विसर पडो नेंदी" ह्यात स्मरण भक्तींत नवविधा भक्तींचा समावेश होतो. कारण स्मरणाशिवाय दुसरी कोणतीही भक्ती होणार नाही. शिवाय स्मरण भक्ती म्हणून निराळी भक्ती आहेच. ज्याप्रमाणे अन्नाच्या निरनिराळ्या पदार्थांत थोड्या बहुत प्रमाणात पाणी असतेच. तरी पिण्यासाठी म्हणून आपण निराळे पाणी घेतोच. त्याप्रमाणे नवविध भक्तीत स्मरण आहेच.

*(क्रमशः)*

**: नारायण :**

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

## आपल्या सद्भक्ति मंदिराच्या शताब्दी वर्षानिमित्त...

(२०२२ ते २०२३)

सकळ सद्भक्तामनी वाटे हर्ष ।
आपल्या मंदिराचे आहे शताब्दी वर्ष ।।
बाबा, भाई, दादाभाई हे त्रयमूर्ति ।
सदैव मंदिरी वास करिती ।।
त्यांची दत्तसेवा फळांस आली ।
सद्भक्तीची इमारत उभी राहिली ।।
सर्व सद्भभक्त करिती जतन ।
अर्पुनि, अपुले तन, मन, धन ।।
मंदिरातील सेवा आणि महोत्सव ।
पार पाडिती उत्साहाने सर्व ।।
सद्भक्तांवर सद्गगुरुंची कृपासाऊली ।
शतकं लोटले तरी सदा लाभली ।।
अशीच असावी तव प्रेमछाया ।
हीच विनंती चरणी गुरुराया ।।
काही घडले अपराध, न्यून काही ।
उदार मनाने पोटात घेई ।।
पिढ्यान्‌पिढ्या घडो तुमची सेवा ।
अशी बुद्धि देई सकळां देवा ।।
युगानुयुगे उभे असावे सद्भक्ति मंदिर ।
आयुरारोग्यं लाभु दे तव भक्ता न देई अंतर ।।
काय मागूं गुरुराया करितो तुज प्रार्थना ।
शक्ति देई सेवा करण्या अम्हां अज्ञजना ।।
तूच अमुचा आधार, दयेचा सागर ।
सन्मार्ग दावी सकळां विनवितो अम्ही पामर ।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**रविवार : २.५.४३**
**सकाळी : ८.५० ते ९.५०**

मागे वर्षापूर्वी माझी तब्येत बिघडली होती. तेव्हा डॉक्टर म्हणाले एक भजन सोडा नाहीतर प्रवचन सोडा, भजन हे माझ्या एकट्याच्या कल्याणासाठी आहे. तेव्हा माझे हित बाजूला ठेवून दुसऱ्यांच्या हिताकडे लक्ष दिले तर भगवान माझे हित करील. कारण भगवान सांगतात :-

या इदं परमं गृह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।

भक्ति मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय।। (भ.गी.)

आम्ही भाषण का करतो ? तर भगवंताची ती आज्ञा आहे. त्याची इच्छा की जे हे गीतेचे रहस्य ते आपल्या इतर भक्तांना समजावे. जे हे कार्य करतील ते काही प्रयास न करता मलाच येऊन मिळतील. असो. ह्या श्लोकांवरून गीता ही ज्ञानपर, वैराग्यपर नसून भक्तिपर आहे. भक्ति ही ज्ञान वैराग्याची माता आहे.

भक्ति अशी तुझी माताच केवळ ज्ञानविरागाची।। (श्रीबाबा)

आई असली की मुले होतात तेव्हा जे भक्ति निरूपण करतात त्यांना परमार्थांत काही करायचे नाही. कित्येक ह्या गीताश्लोकाचा अर्थ असा करतात की, जे पराभक्ति करतात ते मात्र नि:संशय येऊन मिळतात. पण तसा अर्थ नाही. मग भक्ति निरूपणच करा. असे भगवंताने सांगण्याची काय गरज? तर त्याचा खरा अर्थ हाच की जे माझी भक्ति इतर भक्तांना सुलभ करून सांगतात ते नि:संशय मला येऊन  मिळणार. भगवान हे भक्ति निरुपणरुपी मधाचे बोट त्यांना लावून देतो मग ते ती सोडत नाही. परंतु ते कोणाला सांगायला जात नाही. मध हे माशांना आमंत्रण देत नाही. माशाच तेथे धाव घेतात. श्रीरामकृष्ण परमहंस हे कोणालाही advertise  करीत नसत. ते जसे भोळे तसेच वस्ताद होते. भोळे म्हणजे कसे तर निष्कपट.

शंकर भोळा हो भोळा। कपट नसे तिळभरी म्हणुनी सदा गोंवळा।।

शंकराने तर आपली बायकोही देऊन टाकली पण त्याच्या ठिकाणी काहीच झाले नाही ही भावना.

येथे देह नव्हे, खरे जग नव्हे, हा सत्य मृत्यू नव्हे।
काही पाप नव्हे, खरा यम नव्हे, नरकादि काही नव्हे।।
ज्ञात्या दु:ख नव्हे, मूढागती नव्हे, त्या भास खोटा नव्हे।
ब्रह्मानंद-निमग्न चित्त असता काहीच काही नव्हे।। (ना.म.)

हे न समजल्यामुळे शंकराला भोळे म्हणतात. पण आपल्या सामान्य माणसांप्रमाणे तो भोळा नाही. तो भोळा दिसतो. पहा एखादा मोठा श्रीमान मनुष्य आहे त्याच्याकडे सर्व बाजारवगैरे नोकर करतात व त्याच्यावर वेळ पडली तर लक्ष दुसरीकडे असल्यामुळे एखादे वेळेस चुकून पैसे जास्त देतो पण म्हणून त्याला व्यवहार शून्य म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे संताचे लक्ष भगवंताकडे असते ते जर प्रपंचात लक्ष घालतील तर सर्वांत उत्तम प्रपंच करतील. असो.

तेव्हा भजन सोडावे की प्रवचन सोडावे हा प्रश्न होता. मला दोन्ही सोडायचे नव्हते. पण शेवटी भजन श्रवण करावे व प्रवचन करावे असे ठरविले. येथे हवा

उत्तम वाटली म्हणून भजन करत होते. पण आमचे प्रारब्ध आम्हाला करू देत नाही. हे वाईट कर्माचे फळ आहे. पण ते भोगलेच पाहिजे. पण we must feel for it काही झाले तरी भजन हे केलेच पाहिजे. त्याच्यासारखा सुलभ मार्ग नाही.

भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।।

व 'आचरति आचरयतिच इति आचार्या:' ज्यांना जगताला जसे आचरण करण्यास लावावयाचे आहे त्याने स्वत: तसे करून दाखविले पाहिजे. ही अष्टके तशीच आहेत. एक तेवढीच म्हटली तरी पुरे प्रथमची अष्टके श्रीवामन पंडितांची आहेत. पण तेवढ्या लीला श्रीभाईंना अपुऱ्या वाटल्या म्हणून आणखी पुढे त्यांनीत्या वर्णन केल्या आहेत. त्या श्रीवामन पंडितांच्याच आहेत असे वाटतात. असो ह्या दुसऱ्या अष्टकाच्या शेवटी भगवंताने ह्या लीला का केल्या म्हणून सांगतात -

भक्तां प्रियांस्तवन विंभो तव सर्व लीला।
गातां मुखीं हरिसी पाप तमालनीला।
होतांची शुद्धमन दाविसी चित्स्वरूपा।
देसी तया सगुण मुक्तीही मायबापा।।

ह्या लीला गायिल्याने अंत:करण शुद्धि होऊन गुरुमुखाने तू आपले स्वरूप दाखवितोस इतकेंच नव्हे तर पुढे अव्यभिचारी भक्ति करवून जीवनमुक्त दशेपर्यंत पोचवितो पण तेथेच न थांबविता पुढची ज्ञानोत्तर भक्ति करवून मग महासायुज्यता. पंचमपुरुषार्थ सगुणमुक्ति हे जे परमपद पदाची प्राप्ती करवून देतो म्हणून ह्या लीला नेहमी गाव्या व घटपटादि गोष्टी सोडून नेहमी भक्तिनिरुपण करावे. भक्तिचे सुंदर स्वरूप भक्तांपुढे मांडावे की जेणेंकरून त्यांना ही गोडी लागेल. भक्ति प्रसन्न झाली की तिची मुले ज्ञानवैराग्य ही आपोआप येणार. ही भक्ति देण्याचे काम संतांचे आहे म्हणून :-

जगतमाही संत परम हितकारी।।धृ.।।

जगतात संतासारखे परम कल्याण करणारे कोणी नाही. ते ही भक्ति उत्पन्न करून देतात मग योगयाग करण्याची जरूर पडत नाही. श्रीवामन पंडित हेंच

सांगतात :-

नका याग मांडू नका प्राण कोंडू। नका द्रव्य दारा गृहातेंही सोडूं।।

नका कष्टवू पर्वताग्रीं तपाला। मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळां।।

हे नाम इतके गोड आहेपण ते घेणेंच कठीण आहे. श्री नामदेव म्हणतात :-

अमृताहुनि गोड नाम तुझे देवा।

मन माझे केशवा का बा ने घे।।१ ।।

सांगा पंढरीराया काय करू यासी।

का रूप ध्याना सी न ये तुझे।।२ ।।

विठोबालाच सांगतात की तुझे ध्यान करतायला जातो पण भलतेच रूप डोळ्यांपुढे येते. तुझ्या चरणाकडे लक्ष लागत नाही. ह्याला मी काय करू ?

कीर्तनी बैसतं निद्रें नागविले। मन माझें गुंतले विषयसुखा।।३ ।।

कीर्तनाला आदराने, प्रेमाने जातो पण तेथे निद्रा आड येते नाही तर मन भ्रमण करीत राहते.

हरीदास गर्जति हरिनामाच्या कीर्ती।

नये माझ्या चित्तीं नामा म्हणे।।४ ।।

ते बिचारे मात्र कंठशोष करून सांगतात, स्वत:च्या शरीराकडेही लक्ष देत नाही. श्रीभाई पहा तब्येत ठीक नसतानाही प्रवचन करीत. आम्ही जर त्या श्रवणाचा उपयोग केला नाही तर सर्व फुकट आहे. ह्या श्रवणावरून एक आठवण झाली.

श्रीनारायण महाराजांचे शिष्य श्री नारायणबुवा हे चातुर्मासांत मुंबईला पुराण सांगत असत. एका श्रीमान गृहस्थांनी त्यांना बोलावले होते. श्रीबाबा हे तेथे नित्य श्रवणाला जात. एक दिवस कचेरीच्या कामामुळे त्यांन जाता आले नाही. श्रीबाब म्हणजे नेहमी वेळेवर जात. त्यांची येण्याची वेळ टळून गेली तरी थोडावेळ श्रीनारायण  बुवांनी वाट पाहिली व मग 'श्री गुरुदत्तचरणार्पणमस्तु' म्हणून पोथी गुंडाळला व जायला निघाले. यजमान म्हणाले आज न वाचताच का जाता ? ते म्हणाले श्रोते नाहीत. पण यजमान म्हणाले, आम्ही आहोत ना ? श्रीनारायण बुवा म्हणाले तुम्ही झोप काढणारे आज खरा श्रोता नाही. अर्थातच पुढच्यावर्षी त्यांना

त्या गृहस्थाने बोलावले नाही. पण ते कोठे परवा करतात ? असो. कीर्तन, पुराण चालू असता झोप का येते ? तर रजतम हे आड येतात. ईश्वराच्या भजनाच्या ठिकाणी गोडी लागली पाहिजे. हे रजतम ती गोडी घेऊ देत नाही म्हणून त्यांना बाहेर घालवून द्यावे. पण ते जबरदस्त आहेत तेव्हा त्यावर हरिनामाचा मारा करावा.

हुडकुनी असि कुत्सित कामना। तिजवरी हरी नाम हुताशना।
जरि अमंगल चितही घालिती। सकळ पातक बीजची जाळिती।।
(वा.पं.)

नामाकडे लक्ष लागले नाही तर ते निरंतर घ्यावे तेणेकरून पातकांचा नाश होऊन त्याच्या ठिकाणी गोडी लागेल. पण हे स्वत:ला करणे कठीण आहे. सत्संगतीत ती गोडी लवकर मिळते. कारण मोरोपतं म्हणतात :-

तुझेचि यश तारते परि न केवळ तारवे।
सहाय्य असिला असे तरीच शत्रूला मारवे।
न भागवत भेटतां न घडतांही सत्संगती।
न अज्ञहृदयें तशी तव यशोरसी रंगती।।

भगवंता जोपर्यंत तुझा परम भागवत (श्री तुकाराम महाराज, नामदेव इत्यादी) भेटला नाही त्याची संगत झाली नाही तोपर्यंत अज्ञजनांची मने तुझ्या यशोरसांत रंगली जाणार नाहीत. पुष्कळ जण माळ घेऊन जप करतात पण जो नामीं त्याचे रुप आठवत नाहीत :-

नाम रुपा नाहीं मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।

संत हे नाम घेतात व त्याबरोबर वृत्ती स्वरुपांत नेतात. राम म्हणताच निर्गुणस्वरुपाकडे वृत्ती जाते. कृष्ण म्हणताच सर्व कृष्णरुप व्हावे व गोविंद म्हणताच वृत्ती गोविंदरुप करावी.

गोविंद गोविंद। मना लागलीय छंद।।१ ।।
मन गोविंद ते काया। भेद नाही देवा तया।।२ ।।
आनंदले मन। प्रेमें पाझरती लोचन।।३ ।।

तुका म्हणे आळी। जेवीं नुरेचि वेगळी।।४।।

(देवभक्तपण। तुका म्हणे नाही भिन्न।।) गोविंदाशी एकरूप होण्यासाठी महाराजांनी हा अभंग केला व त्याप्रमाणे आनंद भोगला. असो असे हे नामाचे महत्त्व आहे. असे झाले म्हणजे मग ह्याने जरी नाम घेतले नाही तरी नाम त्याला सोडत नाही.

जपेंवीण नाम वदनीं। धारणेंवीण ध्यान मनीं।

संकल्पेवीण मदर्पणीं। सर्व कर्मे करूनी सर्वदा।। (ए.भा.)

हा नाम घेत नाही पण नामाच त्याकडे येते, ध्यान न करता त्याचे व्यापकरूप पाहतो, सर्व कर्मे करून "तहात ब्रह्मपिणमस्तु" म्हणून पाणी सोडत नाही तर सर्व पदार्थ ब्रह्मरूप म्हणून पाहतो, सेवन करतो.

राम म्हणे ग्रासोग्रासी। तोंचि जेविला उपवासी।।१।।

धन्य धन्य ते शरीर। तीर्थाव्रतांचे माहेर ।।२।।

*(क्रमशः)*

◈◈◈

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# — मंगलाचरण —

पद

गाईये गणपती जगवंदन । शंकर सुमन भवानिनंदन।।
सिद्धीसदन गजवदन विनायक । कृपासिंधू सुंदर सबलायक।।१ ।।
मोदकप्रिय मुद मंगलदाता । विद्यावारिधि बुद्धि विधाता।।२ ।।
मागत तुलसीदास कर जोरे । वसहि रामसिय मानस मोरे।।३ ।।

सर्वात्मभावे वंदन

(१) श्लोक

सजयति सिंदुरवदनो देवो यत्पादपंकज स्मरणम्।
वासरमणि: इव तमसां नाशयति विघ्नानाम्।।
अभिदजलयदनिवहं भ्रमरकुनीक सेवित कपोलय्।
अभिमत फळदातारं कामेश गणपती वंदे।।

(२) श्लोक

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै: श्री गुरवे नम:।।

(३) श्लोक

नारायणं नमस्कृत्यं नर चैव नरोत्तमम्।
देवीा सरस्वती व्यासं ततो जयमुदीरयेत्।।
श्रयतां दवेदेवेश नारायण जगत्पते।
त्वदीयनावधानेन कथयिष्ये शुभा: कथा:।।

(४) श्लोक

नमोजी गणेशा नमोजी सुरेशा। नमोस्वप्रकाशा नमो विघ्ननाशा।।
तुला वंदिल्याविण कांही करेना। तया प्रत्यवायो कधींहि पडेना (विघ्ननाशा)।।

### (५) श्लोक

श्रीमद्वामन पदापद्मयुगुली अर्पू मना षट्पदा।
स्वात्मा तो अजी सत्पदे स्फुरतसे दावी स्वयेचिवादा।।
आनंदात्मक तो श्रीहरि-गुरु-आत्मा नसे वेगळा।
ऐसा श्री भगवान् तया नमितसे प्रेमें जगन्मंगल।।

### (६) आर्या

जगदंबे! चिच्छक्ते जी करूनी प्रभू चराचरा धरितो।
त्या तुज सरस्वतीते बाळ तुझा नमन प्रीतिने करितो।।
तव सूत गौडपाद आणि वसिष्ठादि श्रेष्ठ हरिदास।
त्यांच्या चरणरजाते घडू माझे शिरी सदा वास।।

### (७) श्लोक

प्रथम वंदुनि श्रीहरि श्रीपती। नमुं विधि सरसिजोद्भेव त्याहती।
अभि दत्त चरणां स्वशिरी धरूं। अयन आश्रय नरांसचि स्मरूं।।

### (८) साकी

नारायण द्वय - राधाकृष्ण - हाती देऊंनि हाता।
शंकरसुत - श्रीरामचंद्र प्रभू चरणीं ठेवूं माथा।।
वामन पंडित - रामदास - श्री तुकाराम - श्री नाथा।
कायावाचामनें सेवुनी नमन करूं या संता।।

### (९) आर्या

श्री मांगिरीश वंदुनि वंदू रामेशहि रसेशाळा।
पुरुष प्रभृति नमुनि नमूं प्रेमें देव - भक्त - सकळांला।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे

## परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) संताचे भाग्य आणि ध्येय असेच अनुभवास येतात. समाजासाठी जन्मभर चंदनाप्रमाणे झिजतात. त्यांना भक्तही मिळतात पण अनुयायी भक्त क्वचित मिळतात. कारण त्यांना कुणीच ओळखत नाहीत. त्यांच्या हयातीत त्यांचे वास्तव रुप समजून घेण्याचा प्रयत्नही केला जात नाही.

२) संतांच्या सचोटीच्या परमार्थाला नतद्रष्ट मंडळी सौदेबाजीचा बट्टा लावतात. अशांच्या खोटे मोठेपणाचे पोकळ पडघम नेहमी वाजवत असतातच. पण संतांच्या अंतरींच्या वेदना सत्तामदाने झिंगलेल्या नि संपत्तीच्या संगतीने बहकलेल्या लब्धप्रतिष्ठांना कळणे शक्यच नाही.

३) संतांची राहणी साधी, स्वच्छ चारित्र्य, मनमोकळ्या पण प्रसंगी कठोर स्वभाव, कष्ट करण्याची तयारी, अभ्यासू व झुंजार वृत्ती, समजाविषयी आत्मियता, नि:स्वार्थ भावना, प्रखर श्री सद्गुरुनिष्ठा, लहान बालकाप्रमाणे निरागस, पण जेथे ठाम पुरोगामी मते मांडायवयाची त्याप्रसंगी ते परखडपणे मांडतात.

४) गंगेसारखे पवित्र अंत:करण असलेल्या संतांजवळ सर्वांबरोबर घेऊन कसे पुढे जायचे याचे कौशल्य परिपूर्ण असते. आपल्या संस्काराने अनेक गुणवंत माणसे घडवतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व सूर्याची प्रखरता अन् चंद्राची शीतलता लाभलेले असते.

५) थव्यात उडणाऱ्या पाखरांच्या पंखांत गरुडाच्या पंखांची ताकद नसते. म्हणून ते त्याला राजा मानतात, त्याची आरती करतात. पण गरुडाबरोबर उड्डाण मात्र कधी करीत नाही. त्याला जन्मभर एकाकीच उडावे लागते.

६) प्रपंचांत दक्ष व परमार्थात लक्ष असे असावे. प्रपंच करीत असतान परमार्थाची आठवण ठेवा. तो सोडून देण्याची जरुरी नाही. पाण्यात गेले म्हणजे किनाऱ्यावर यावयाचे आहे ही जशी भावना असते तशीच प्रपंचात वागत असताना शेवटी आपल्याला गुरुचरण गाठावयाचे हे लक्षात ठेवा. सर्व

व्यवहार करावे पण मन ईश्वराकडे असावे. (मन:कृतं कृतं राम न शरीर कृतं कृतम्।।) ह्याच्या उलट मात्र होता कामा नये.

७) खऱ्या विद्वानाची विद्वता तो कुठेही गेला तरी लपून रहात नाही.

८) आयुष्यातील साधे क्षणदेखील कणाकणाने उपभोगण्याची व त्यातून निर्भेळ आनंद लुटण्याची संधी वाया घालवू नये हेच खरे!

९) आदर्श आणि व्यवहार यांचा समन्वय साधावा लागतो. गुळगुळीतपणा सोडून हात राखून बोलणे, चालणे सोडून निश्चित योजनांवर कार्य आखणे हितावह असते. पूर्वग्रह नसावेत व नसते भाबडे आदर्शही नसावेत. आपले विचार स्पष्ट मांडतांना भाषेचा फुलोरा नसावा व ते विचार ठोस पुराव्यावर आधारलेले असावेत.

## : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | **:** | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | **:** | 006100100000130 |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.

**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | |
|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **भ्रमणध्वनी : ९८२०३५०८६७** |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **भ्रमणध्वनी : ९८२१२७०७७२** |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **भ्रमणध्वनी : ९२२३२२२२४५** |

✦✦✦

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# पौष, माघ, फाल्गुन मासांतील (जानेवारी ते मार्च) महिन्यातील उत्सव व महोत्सव

**पौष मास :**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १.१.२०२३ | गोखिवरे (वसई पूर्व) येथील श्री कृष्णमूर्ती मंदिराचा स्थापना दिन असतो. तेथे काही सद्भक्त मंदिरात जाऊन पूजा व भजन करतात. |
| शुक्रवार | दि. १३.१.२०२३ (पौष वद्य षष्ठी) | श्री तात्यासाहेब कोटणीस महाराज पुण्यतिथी दिन. |
| रविवार | दि. १५.१.२०२३ | मकरसंक्रांती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. तिळगूळ घ्या गोड बोला ह्या विषयावरील प्रवचनाचे श्रवण. |
| बुधवार | दि. १८.१.२०२३ (पौष वद्य एकादशी) | षटतिला एकादशी रोजी गुरुमाता श्री पार्वतीमाता पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ चरित्राचे वाचन. |

**माघ मास :**

**परात्पर गुरु श्री. नारायणबाबा (रत्नागिरीवासी) व परमेष्ठि गुरु श्री राधाकृष्ण तोरणे पुण्य तिथ्योत्सव**

**मातोश्री लक्ष्मीमाता पुण्यतिथी दिन**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. २२.१.२०२३ (माघ शुद्ध प्रतिपदा) | रोजी मातोश्री श्री लक्ष्मीबाईमाता पुण्यतिथी प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. २३.१.२०२३ (माघ शुद्ध द्वितीया) | परात्पर गुरु श्री नारायणबाबा रत्नागिरीवासी व परश्रेष्ठी गुरु श्री राधाकृष्ण तोरणे महाराज ह्यांचा पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. २५.१.२०२३ (माघ शुद्ध ४) | श्री गणेश जयंती. सायं. ५ वाजता श्री सिद्धिविनायकाचे व्यापक स्वरूप ह्या |

| | | |
|---|---|---|
| | | विषयावरील प्रवचनाचे वाचन. सायं. ६ वाजता नामसंकीर्तन. |
| गुरुवार | दि. २६.१.२०२३ (माघ शुद्ध ५) | सद्भक्ती बालमंडळ वाढदिवस, वसंत पंचमी, श्री शांतादुर्गा महोत्सव. सायं. ७ वाजता रासलीला अभिनय व श्रीकृष्ण भक्तीपर पदे आणि वैकुंठीचा प्रसादमेवा ह्या श्री सद्गुरु दादाभाईंच्या आशिर्वादपर प्रवचनाचे वाचन. |
| शनिवार | दि. २८.१.२०२३ (माघ शुद्ध ७) | रथसप्तमी श्री सूर्यनारायणाचा फोटो ठेवणे. |
| शुक्रवार | दि. ३.२.२०२२ | सायंकाळी ५ वाजता श्री राधाकृष्ण तोरणे यांच्या चरित्राचे वाचन. |
| रविवार | दि. ५.२.२०२३ | माघ पौर्णिमा श्री मंगेश महोत्सव रात्री ९.०० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| बुधवार | दि. १५.२.२०२३ | माघ कृ. ९ श्री रामदास नवमी. सायं. ५ वाजता श्री रामदास स्वामींच्या चरित्राचे वाचन. |
| शनिवार | दि. १८.२.२०२३ (माघ कृ. १४) | महाशिवरात्री. दुसऱ्या दिवशी श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी सकाळी ६.३० वाजता. |
| मंगळवार | दि.२१.२.२०२३ | श्री रामकृष्ण परमहंस जयंती. सायं. भजनानंतर ६ मार्च १९२७ रोजी खार मिशनमध्ये झालेल्या प्रवचनाचे वाचन. |

**फाल्गुन मास :**

**श्री दत्तमूर्तींच्या व श्री नारायण महाराजांच्या सुवर्ण पादुकांचा व श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन व श्री रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. २६.२.२०२३ (फाल्गुन शुद्ध सप्तमी) | श्री रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. स. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. १.३.२०२३ (फाल्गुन शुद्ध दशमी) | श्री दत्तमूर्ती व नारायण महाराज सुवर्ण पादुका स्थापना. श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना सकाळी ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. आणि महाप्रसाद. सायंकाळी जगदाराध्य दत्तमूर्ती (त्रिमूर्ती)च्या स्थापना या विषयावरील प्रवचनाचे श्रवण व वाचन व रात्रौ ९ वाजता पालखी व मिरवणूक. |
| गुरुवार | दि. २.३.२०२३ (आमलकी एकादशी) | श्री प्रतिष्ठानचरित्र - श्री एकनाथ महाराजांच्या चरित्र वाचनास प्रारंभ. |
| **परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाईंचा पुण्यतिथी महोत्सव** | | |
| सोमवार | दि. ६.३.२०२२ (फाल्गुन शुद्ध १४) | श्री गौरांग प्रभू जयंती दिन. |
| मंगळवार | दि.७.३.२०२३ (फाल्गुन पौर्णिमा) | श्री दादाभाईंचा पुण्यतिथी दिन. सकाळी ११.३० वाजता गुरु पादुकास एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण संर्तपण. आणि महाप्रसाद. सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठान चरित्र वाचन. नंतर श्री दादाभाईंचे वैकुंठारोहणावर वाचन व नंतर सद्गुरु दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| गुरुवार | दि. ८.३.२०२३ (फाल्गुन कृ. २) | श्री तुकाराम महाराज पुण्यतिथी दिन. सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. १३.३.२०२३ (फाल्गुन वद्य षष्ठी) | श्री एकनाथषष्ठी. श्री एकनाथ महाराज पुण्यतिथी. सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठान चरित्र वाचन समाप्ती. त्यानंतर श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण व उत्सव समाप्ती. आम्हा अज्ञ बालकांची सेवा मान्य करून घ्यावी ही कळकळीची प्रार्थना. |

**विशेष सूचना :-** प्रत्येक उत्सवाचे दिवशी सकाळी स्तवन व प्रार्थना केली जाते.

✦✦✦

# विशेष सूचना

सर्व भक्तांना कळविण्यास आनंद होतोय की आपले संकेत स्थळ, अर्थात वेबसाईट, www.sadbhaktimandir.com आता पूर्णतः कार्यरत झाले आहे. श्री दत्तगुरुंची कृपा, श्री नारायण महाराज जालवणकरांची आज्ञावजा प्रेरणा आणि प.पु. सद्‌गुरु श्री टाकी महाराज ह्यांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

सद्भक्ती मंदिर, प.पू. श्री टाकी महाराज (तिन्ही पिढ्या), श्री दत्तगुरु परंपरा, संत साहित्य, संत चरित्र, काही निवडक पदांचे श्राव्य प्रसारण (ऑडिओ), काही फोटो, आगामी उत्सव किंवा कार्यक्रमांची माहिती आणि इतर आवश्यक बाबी, इत्यादी उपयुक्त माहिती ह्या संकेत स्थळावर दिली आहे.

सद्भक्ती प्रकाश हे आपले त्रैमासिक देखील ह्या संकेत स्थळावर उपलब्ध केले जाते. सदरहू त्रैमासिक देखील योग्य समयी अपलोड केले जाईल. जिज्ञासूंनी ह्या संकेत स्थळाला जरूर भेट द्यावी आणि आमच्याशी संपर्क साधावा. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हे आपले Facebook सदर (पेज) सुद्धा कार्यरत झालेले आहे.

सर्व भक्तांना विनंती आहे की त्यांनी आपल्या व्हॉट्सॲप आणि फेसबुक वरील आणि इतर मित्र परिवारात, ह्या आपल्या दोन्ही प्रसार स्थळांची माहिती देऊन सद्भक्ती मंदिर आणि सद्भक्तीपंथ ह्यांचा जास्तीत जास्त प्रसार होऊन आपल्या प.पु. सद्गुरुंचे विचार आणि त्यांची शिकवण सर्वत्र प्रसिद्ध होण्याकरिता हातभार लावून गुरुसेवेच्या ह्या संधीचा लाभ घ्यावा.

# सद्भक्ती मंदिर शताब्दी वर्ष

कालावधी ५ ऑक्टोबर २०२२ ते २४ ऑक्टोबर २०२३
ह्यातील १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ ह्या कालखंडातील
काही कार्यक्रमांची रूपरेषा

<table>
<tr><th>क्र.</th><th>दिनांक आणि वार</th><th>वेळ</th><th>कार्यक्रम</th><th>दिनविशेष</th><th>कलाकार / सहभाग</th></tr>
<tr><td>१.</td><td>८ जानेवारी २०२३ रविवार</td><td>सा. ५.३० वा.</td><td>भजनसंध्या</td><td></td><td>स्वरधारा संस्था, जोगेश्वरी (पूर्व), संचालक श्री. वासुदेव (बाळा) कांबळी</td></tr>
<tr><td>२.</td><td>२२ जानेवारी २०२३ रविवार</td><td>सा. ५.३० वा.</td><td>नामसंकीर्तन</td><td></td><td>सद्भक्ती मंदिर भक्तगण</td></tr>
<tr><td>३.</td><td>२९ जानेवारी २०२३ रविवार</td><td>सा. ५.३० वा.</td><td>भजनसंध्या</td><td></td><td>तालय संस्था, जोगेश्वरी (पूर्व), संचालिका कु. सानिका बर्वे</td></tr>
<tr><td>४.</td><td>१४ फेब्रुवारी २०२३ मंगळवार</td><td>सा. ५.३० वा.</td><td>प्रवचन - प.पू. सद्गुरु श्री रघुनाथ स्वामी नाशिककर ह्यांचे जीवनचरित्र</td><td></td><td rowspan="2">श्रीक्षेत्र नरसोबा वाडीचे महंत प.पू. श्री विवेकबुवा गोखले</td></tr>
<tr><td>५.</td><td>१५ फेब्रुवारी २०२३ बुधवार</td><td>सा. ५.३० वा.</td><td>प्रवचन - प.पू. सद्गुरु श्री निरंजन रघुनाथ स्वामी ह्यांचे जीवन चरित्र</td><td></td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | १६ फेब्रुवारी २०२३ गुरुवार | सा. ५.३० वा. | प्रवचन - प.पू. सद्गुरु श्री नारायण महाराज जालवणकर ह्यांचे जीवन चरित्र | | श्रीक्षेत्र नरसोबा वाडीचे महंत प.पू. श्री विवेकबुवा गोखले |
| ७. | १७ फेब्रुवारी २०२३ शुक्रवार | सा. ५.३० वा. | प्रवचन - श्री गुरुपरंपरा, प.पू. सद्गुरु श्री टाकी महाराज आणि सद्भक्ती मंदिर | | |
| ८. | १८ फेब्रुवारी २०२३ शनिवार | सा. ५.३० वा. | प्रवचन - श्री शिवमहात्म्य **(श्री रामेश्वर मंदिरात)** | महाशिवरात्र | |
| ९. | २५ मार्च २०२३ शनिवार | दु. २.०० वा. | सुंदरकाण्ड पाठ | | भक्त मंडळ, मुंबई |

**ता.क.** : दि. १८ फेब्रुवारी २०२३ म्हणजे महाशिवरात्रीच्या दिवशी कार्यक्रम श्री रामेश्वर मंदिरात होईल. इतर सर्व कार्यक्रम सद्भक्ती मंदिरात होतील.

# शोकवृत्त

गुरुभगिनी श्रीमती प्रेमलता रघुनाथ ताम्हाणे - म्हणजेच सर्वांना पमाताई या नावाने परिचित असलेल्या - यांचे २१ नोव्हेंबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. लहानपणापासून कै. प.पू. दादाभाईंच्या सेवेची संधी मिळालेल्या व कै. प.पू. दादाभाईंचे प्रत्यक्ष संस्कार लाभलेल्या जुन्या पिढीतील जी थोडीशी मंडळी होती त्यामध्ये पमाताईंचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. कै. ती. रघूजी ताम्हाणे यांचे कुटुंब कायम सद्भक्ति मंदिराच्या सेवेत होते. आणि अशा कुटुंबामध्ये जन्म मिळण्याचे भाग्य त्यांन लाभले होते.

पमाताईंचा जन्म १९३४ मधला. शिक्षण संपल्याबरोबर त्यांना पश्चिम रेल्वेमध्ये नोकरी मिळाली. तिथे त्यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण करून निवृत्त होईपर्यंत काम केले. पण नोकरीत असतानासुद्धा त्यांचे चित्त कायम सद्भक्ती मंदिरात असायचे. त्यामुळे जमेल त्यानुसार त्या सकाळ-संध्याकाळ मंदिराच्या सेवेला वेळ देत असत. निवृत्तीनंतर तर त्यांनी पूर्णपणे मंदिराच्या सेवेत स्वत:ला झोकून दिले. कै. बेबीआत्या सुळे यांच्या बरोबरीने त्या मंदिराच्या सर्व सेवा सांभाळत असत. ही सेवा त्यांनी अविरत, स्वत:ची गात्रे साथ देत होती तोपर्यंत चालू ठेवली. शेवटी शेवटी तर त्या कशाबशा काठी टेकून कुणाला तरी मदतीला घेऊन मंदिर गाठत असत. शेवटी मंदिरात जाणे अगदीच अशक्य झाल्यानंतर त्यांनी दररोज घरीच भजन म्हणायला सुरुवात केली.

पमाताईंची ओळख म्हणजे त्यांचा भाबडा आणि प्रेमळ स्वभाव. कुणावरही पूर्ण विश्वास त्या ठेवायच्या. अगदी दारात आलेल्या भाजीवाल्याला किंवा डिलीव्हरीला आलेल्या माणसाला त्या चहा विचारल्याशिवाय जाऊ देत नसत. रेल्वेत नोकरीला असल्यामुळे त्या सर्व हिंदुस्तान फिरल्या होत्या. पण एवढ्या प्रदीर्घ प्रवासानंतरही त्यांच्या स्वभावातला साधेपणा व भाबडेपणा तसाच राहिला होता. कधीच कुणाबद्दल राग नाही. पण लोभ मात्र सर्वांचा. कोणत्याही प्रकारचा कृत्रिमपणा त्यांच्या स्वभावात नव्हता.

पमाताईंच्या जाण्याने कै. प.पू. दादाभाईंच्या सान्निध्यात वाढलेल्या पिढीतला आणखी एक दुवा निखळला!